**अमरावती महानगरपालिका, अमरावती**

**दिनांक ३.३.२०२३ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ६७ -** जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण 2022-23 अंतर्गत विकास कामांचा प्रस्ताव सादर करणे बाबत.

संदर्भ - मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे प्राप्त पत्र क्र. जिनिस/नि.भवन/अम/जिवायो/निव्य(तरतुद)/2022/217 दिनांक 20/04/2022

**ठराव क्रमांक ६७ -** जिल्हा वार्षिक योजना सन **2022-23** या आर्थिक वर्षात संदर्भीय पत्रान्वये अमरावती महानगरपालिकेस खालील विकास शिर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार निधी प्राप्त होणार आहे.

| अनु. क्र. | विकास शिर्ष/उपशिर्ष/ योजनेचे नांव | मंजूर अर्थ- संकल्पीय तरतूद सन 2022-23 | अर्थ- संकल्पीय तरतूद सन 2023-24 |
|---|---|---|---|
| 1 | विकास योजना राबविण्यासाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान (कार्यक्रम) | 2300 लक्ष | 01 लक्ष |
| 2 | महाराष्ट्र नगरोस्थान महा अभियान साठी नगर पालिका / महानगरपालिकांना अनुदाने | 300 लक्ष | 750 लक्ष |
| 3 | अग्नीशमनसेवा व आणिबाणींच्या सेवांचे बळकटीकरण | 300 लक्ष | 300 लक्ष |
| 4 | नागरी दलितत्तेतर वस्त्यांमध्ये सुधारणा (कार्यक्रम) | 1100 लक्ष | 1680.98 लक्ष |

सन **2022-23** व **2023-24** या आर्थिक वर्षात मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या अनुषंगाने प्रस्तावित कामाचे नियोजन करणे अत्यावश्यक आहे.

महाराष्ट्र नगरोस्थान महा अभियान साठी नगर पालिका/ महानगरपालिकांना अनुदाने शासन निर्णय दिनांक 16 मे, 2016 अन्वये प्रकल्पाच्या मंजूर किंमतीपैकी 'ड' वर्ग मनपा साठी 30 टक्के हिस्सा टाकणे बंधनकारक आहे. तरी मंजूर वितरीत तरतुदीच्या 30 टक्के हिस्सा टाकण्यास सभेच्या मंजूरीस सादर.

वरीलप्रमाणे विकास शिर्षा/योजने अंतर्गत विकास आराखडाचा प्रारुप प्रस्ताव **iPass (Integrated Planning Office operation System)** प्रणाली वर सादर करावयाचा आहे.

सन **2022-23** व सन **2023-24** मध्ये जिल्हा नियोजन कडुन प्राप्त होणाऱ्या नियतव्यय नुसार शिर्ष निहाय कामाची निवड निश्चिती करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे करीता विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**